* मसुदा समिती (Drafting Committee)

* प्रस्तावना

इ. स. 9 dec 1946 रोजी भारताचे संविधान निर्माण करण्यासाठी संविधान सभेची / घटना समितीची स्थापना करण्यात आली होती. संविधान सभेने संविधान बनवण्याच्या विविध कामांसाठी एकुण 22 समित्या नेमल्या होत्या. यापैकी आठ प्रमुख समित्या तर इतर उपसमित्या होत्या.

आठ प्रमुख समित्यांपैकी मसुदा समिती, केंद्रीय उर्जा समिती, केंद्रीय घटना समिती, प्रांतीय घटना समिती, मुलभूत हक्क, अल्पसंख्यांक आणि आदिवासी आणि अपवर्जीत क्षेत्रांची सल्लागार समिती इ. महत्त्वपूर्ण समित्या होत्या.

घटना समितीतील सर्वात महत्त्वपूर्ण समिती म्हणजे मसुदा समिती होय. नवीन राज्यघटना निर्माण करण्यापूर्वी त्याचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी या मसुदा समितीवर होती.

29 August 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. भारतीय संविधानाचा मसुदा तयार करण्याच्या सात सदस्यांमध्ये, डॉ. बी. आर. आंबेडकर, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन गोपालस्वामी, के. एम. मुन्शी, मोहम्मद सादुल्ला, बी. एल. मित्र आणि डि. पी. खेतान यांचा समावेश होता. 29 ऑगस्ट रोजी झालेल्या पहिल्या बैठकीत डॉ. बी. आर. आंबेडकर यांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणुन निवड झाली.

ऑक्टोबर 1947 च्या अखेरीस, मसुदा समितीने सल्लागार बी. एन. राऊ यांनी सादर केलेल्या मजकुराची छाननी करण्यास सुरुवात केली.

त्यात सुधारणा करून तो संविधान सभेच्या अध्यक्षांकडे पाठवण्यात आला.

* मसुदा समितीचे सदस्य.

डॉ. बी. आर. आंबेडकर
अल्लादी कृष्णस्वामी अय्यर
गोपालस्वामी अय्यंगार
एम. मुन्शी
मोहम्मद सादुल्ला
एल. मित्तर
डी. पी. खेतान

* मसुदा समितीचे कार्य व भुमिका.

1. संविधान मसुदयाचे प्रारुप (स्वरुप, Nature) तयार करणे.
2. कायदेशीर सिद्धांत तयार करणे
3. संविधानिक संरचना निश्चीत करणे
4. मुलभूत हक्क व अल्पसंख्यांक आणि आदिवासींच्या हक्कांचे रक्षण करण्यायोग्य कायदे व सिद्धांत तयार करणे
5. व्यक्तिगत हक्कांचे संरक्षण
6. आधुनिक विचारसरणीचा समावेश
7. सर्वसमावेशक दृष्टीकोन
8. महत्वपूर्ण ऐतिहासीक दस्तऐवज
9. (तत्कालीन) सामाजिक व राजकीय समस्यांवर विचार.

भारतीय संविधान सभेतील मसुदा समितीने भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यात महत्वपूर्ण भुमिका बजावली. संविधान सभेतील बहुतेक चर्चेत मसुदा समितीचे वर्चस्व राहिले. याच आधारावर भारतीय राज्याची कार्यपद्धती व संविधानीक संरचना तयार करण्यात मोठे योगदान मसुदा समितीने दिले आहे.